## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २७९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३१/०५/२०१८

**१) किराणा दुकानातील नगदी पैश्याची चोरी :–**

दिनांक २९/०५/२०१८ चे २१.०० वाजता ते ३०/०५/२०१८ चे ०७.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी पुरुषोत्तम सुदरदास गुललानी वय ६९ वर्ष, रा. सावरी याचे विनस प्रोव्हीजन किराणा दुकाना मध्ये कोणीतरी अज्ञात चोराने लोखंडी जिण्याचे पाय–या वरुन चढुन दुकानाचे स्लॅप वरील अर्धवट उघळया असलेल्या कुजलेल्या दारामधुन आत प्रवेश करुन उघडा असलेल्या गल्यामधील नगदी २९,०००/–रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) गैरकायदयाची मंडळी जमवुन लाथा बुक्यांनी मारल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २४/०५/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी राहुल अरुण लाहुत्रे वय ४६ वर्ष रा. राजापुर व त्याचा भाऊ अनिल याचेसह चिखला गावा कडुन स्कुटर क्र. एमएच ३५ ई ५३०६ ने राजापुर कडे येत असता यातील आरोपीतांनी त्याला साईड दिली नाही गावात आल्या नंतर यातील आरोपीतांनी संगनमत करुन गैरकायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी हा किराणा दुकानातुन अंडी घेवुन येत असता त्याला पकडुन लाथा बुक्यांनी मारल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३४१,३२३,१४३,१४७,१४९भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुंडले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**३) मुलीवर अत्याचार केल्याने गुन्हा नोंद :–**

मगील १० महिण्या पासुन आज पर्यत यातील आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आमिष दाखवुन तीला वेगवेगळया ठिकाणी नेवुन तिचेवर तिचे मना विरुध्द वारंवार लैगिंक अत्याचार करुन व लैगिंक अत्याचारास तयार न झाल्यास मारण्या पिटण्याची धमकी देवुन लैगिक अत्याचार करीत राहीला व फिर्यादीने आरोपीने लग्ना बाबत विचारपुस केली असता आरोपीने नकार दिल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७६(२)(एन), ५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनि. सोरसे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**४) पिकअप चालकाने बैलाला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ३०/०५/२०१८ चे ०९.३० वाजता ते ०९.४५ वाजता पर्यत यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन नरसिंहटोला शिवार येथे फिर्यादीचे बैलाला धडक मारुन बैलास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी संग्राम जयदेव चामलाटे वय ४५ वर्ष, रा. नवेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम २७९,४२९ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सलामे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**५) मोटार सायकलची चोरी :–**

दिनांक ३०/०५/२०१८ चे १९.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी भुपेश श्रीपदजी खराबे वय २५ वर्ष, रा. माडगी यानी आपली स्पलेन्डर प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ ई २५७९ किंमती २५,०००/–रु. ची देव्हाळा बाजारात लॉक करुन ऊभी ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोराने मोटार सायकलचा लॉक तोडुन मोटार सायकल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन करडी येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावणे पोलीस स्टेशन करडी हे करीत आहेत.

**६) जि. प. हायस्कुल सीपीयु, कॅमेरा, केबर वायरची चोरी :–**

दिनांक २०/०५/२०१८ ते २०/०५/२०१८ चे ०७. ०० वाजता दरम्यान यातील जि. प. हायस्कुल १कॅमेरा, २ एमबीआरडम कॅमेरा सीपी प्लस पसनी– सीपीयु एलसीडी २०१३ एस कंपनीचा कॅमेरा किंमती ४,५००/–रु. पांढरा केबल वायर १०० फुट किंमती १२,०००/–रु. असा एकुण १६,५००/–रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने चोरुन नेल्याने फिर्यादी विनोद गोपाळराव मिसाळकर वय ५३ वर्ष, रा. नाकाडोंगरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तांडेकर पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**७) अज्ञात आरोपी मोटार सायकलच्या निष्काळजीपनामुळे धडकेत चिमुरडी जखमी :—**

दिनांक २६/०५/२०१८ ते १८.०० वाजता दरम्यान यातील अज्ञात आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही निष्काळजीपने, हयगयीने चालवुन जखमी कु. प्रतिक्षा कैलास सोनवाने वय ५ वर्ष, ६ महीने रा. धर्मापुरी हीला धडक मारुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने पो. स्टे. लाखांदुर येथुन जखमीचे प्राप्त कागदपत्रे व फिर्यादीचे बयाना वरुन व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे. पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**८) औषधोउपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २३/०५/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील मृतक महेन्द्र प्रभु रामटेके वय ५४ वर्ष, रा. सावरी याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथील वार्ड क्र. ०९ मध्ये भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो. वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाने आज रोजी प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. साखरे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**९) औषधोउपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २७/०५/२०१८ चे १६.२० वाजता दरम्यान यातील मृतक सुरज छोटु वरखडे वय ४७ वर्ष, रा. सितासावंगी याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सुबो. दवाखाना तुमसर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो. वरुन पो. स्टे. तुमसर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाने आज रोजी प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. चांदेवार यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मेश्राम पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**१०) गरोदर महिलेचा उपचारा दरम्यान मृत्यु :—**

दिनांक १८/०५/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील मृतक सौ. सुनंदा राहु शहारे वय ३५ वर्ष, रा. मरेगाव ही साळेतीन महिण्याची गरोदर असतांना तीचे पोटातील बाळ सरकल्याने व बिपी लो झाल्याने तीला औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. जांभुळकर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पोलीस स्टेशन पालांदुर हे करीत आहेत.

**११) मोटार सायकलवरुन खाली पडुन युवकाचा मृत्यु :—**

दिनांक ३०/०४/२०१८ चे १४.०० ते १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक वैभव सिताराम भिवगडे वय २९ वर्ष, रा. रा. प्रभाग क्र. लाखनी हा आपले मोटार सायकलने कनेरी वरुन लाखनी कडे येत असता मोटार सायकल समोरुन बंदर आडवा येवुन मृतक हा मोटार सायकलचे खाली पडुन त्यास डोक्याला व चेह—याला मार लागुन गंभिर जखमी झाल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. थेर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास मपोउपनि. फटींग पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**१२) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २३/०५/२०१८ चे १९.३० वाजता दरम्यान यातील मृतक दामोधर साधु दिघोरे वय ५० वर्ष, रा. सावरी मरमाडी याने कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो वरुन पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र आज रोजी प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. थेर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**१३) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :—**

दिनांक २१४/०५/२०१८ चे २३.३० वाजता दरम्यान यातील मृतक प्रमोद नत्थुजी ठवकर वय ५२ वर्ष, रा. तात्या टोपे वार्ड भंडारा याने विषारी औषध प्राशन करुन प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पो. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र आज रोजी प्राप्त झाल्याने, सरतर्फे फिर्यादी पोहवा. गायधने यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अवये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**१४) अवैध हातभट्टी,देशी दारु / जुगार अडड्यांवर धाडी . :—**

दिनांक ३०/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन वरठी, तुमसर, आंधळगाव व करडी येथे हातभट्टी, देशी दारू/ जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ०५ लिटर हातभट्टी किंमती ५००/—रु. व ०१ लिटर ६२० मिली लिटर देशी / विदेशी दारु किंमती ६२४/—रु. तसेच जुगारातुन ५५/—रु. असा एकुण किंमती १,१७९/—रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१५) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक ३०/०५/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ६२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी — ०१, तीन सिटर वाहनाकरीता— ०८ ईतर वाहनांवरती — ५३ केसेस करण्यात आले आहे.

(सपोनी. जी.एम. काळे )
स्थागुशा भंडारा
दुरध्वनी.क्र. ९०२१२८२०३५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.
**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.